**नि. फौ.ख .नं. ४७/२०२४**

म. सरकार वि. अभिजीत संभाजी पाटील

**निशाण नं.१८/क**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. आर. एच. पाटील यांचेमार्फत वकील श्री. व्ही. ए. पाटील यांचेमार्फत पुन्हा शपथेवर सुरु,</u>**

४.मी कोडोली पोलीस स्टेशनमध्ये २०१९ ते जून २०२५ पर्यंत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. २८.०९.२०२३ रोजी अनंत चतुर्दशी असल्यामुळे कोडोली तसेच कोडोली सभोवतालच्या इतर परिसरात विसर्जन मिरवणुका सुरु होत्या. हे म्हणणे खरे आहे की, कोडोली पोलीस ठाणे कार्यक्षेत्र येणाऱ्या गावांमध्ये आमच्या ठाण्याचा बंदोबस्त होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी आमच्या पोलीस स्टेशनमध्ये कर्मचाऱ्यांना बंदोबस्ताकरिता गाव नेमून देण्यात आलेले होते.

प्रश्न – त्या दिवशी तुमची नेमणुक कोडोली गावातील बंदोबस्ताकरिता नव्हती ?

उत्तर – मी पथकामध्ये असल्यामुळे आम्हाला सर्व गावांमध्ये भेट द्यावयाची होती.

५. त्या दिवशी आम्ही कोडोली, सातवे, माले या गावांना भेट दिली. सातवे, माले या ठिकाणी मी स्वतः गेलो होतो. त्या दिवशी आम्ही सातत्याने फिरतीवर होतो त्यामुळे अचुक वेळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी कोडोली, सातवे, माले या ठिकाणी आम्ही सतत फिरतीवर असल्यामुळे त्याबाबतची अचूक वेळ मला सांगता येणार नाही.

६. कोडोली गावात अंदाजे १२० मंडळे आहेत त्यापैकी ५४ मंडळांना परवानगी मिळालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अनंत चतुर्दशी सर्व मंडळे एकाच दिवशी मिरवणुक काढतात. माझ्या माहितीनुसार कोडोली गावात अनंत चतुर्दशी दिवशी २६ मंडळांना अंदाजे परवानगी देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्या त्या मंडळांचे गणपती हे ज्या त्या गल्लीमध्ये बसविलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, मंडळातील गणपतींची मिरवणुक ही त्यांच्या गल्लीपासूनच सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, मिरवणुक पाहण्याकरिता मंडळातील लोक, आजूबाजूच्या

परिसरातील लोक तसेच इतर गावातील लोक ती पाहण्याकरिता येतात. हे म्हणणे खरे नाही की, मिरवणुक कुठून सुरु झाली हे मला सांगता येणार नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, सर्व मंडळे महाराणा प्रताप चौकामध्ये पहिल्यांदा जमतात. विसर्जन मिरवणुक अंदाजे ६ वाजल्यापासून सुरु होते. माझे शिक्षण बी. ए पर्यंत झालेले आहे. ध्वनी मापक यंत्र माझ्या माहितीनुसार ऑप्टीक्स कंपनीचे आहे. सदरचे यंत्र आम्हाला पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळाले होते. सदर यंत्र मी प्रशिक्षण पुर्ण करून येताना घेवून आलो होतो. सदर यंत्राचा ताबा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून माझ्याकडे देण्यात आल्याबाबतचा कागद झाला नव्हता. सदरचे यंत्र गणपती उत्सव सुरु होण्याअगोदार दोन चार दिवस आधी देण्यात आले होते. सदरचे यंत्र हे डेसीबल आपोआपच घेते.

८. सदर यंत्र हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण मी घेतलेले आहे परंतु सदरचे यंत्र संगणकीकृत आहे किंवा इतर याबाबतचे तांत्रिक ज्ञान मला नाही. सदर मशीनने आत्मसात केलेला आवाज प्रिंटरच्या माध्यमातून प्रिंट काढली जाते. प्रिंट काढण्याकरिता छोटा प्रिंटरला जोडला जातो. हे म्हणणे खरे नाही की, सदरची प्रिंट आम्ही पोलीस स्टेशनला बसून काढली होती. सदर यंत्र आवाज आत्मसात करण्याकरिता दोन मिनीटांचा वेळ घेते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, कितीही कालावधीचा आवाज हा आत्मसात करता येवू शकतो मात्र आम्ही दोन मिनीटे आवाज घेतला होता. आम्ही ज्यावेळी पूर्व पडताळणी केली होती त्यावेळी मिरवणुक सुरु नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, यंत्रामधील डाटा आम्ही भरतो.

९. मला दाखविण्यात आलेल्या नि. १४ वरील डयुरेशन मध्ये २ मिनीट २६ सेकंद एवढा कालावधी नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मंडळाच्या मागे व पुढे मंडळे होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत मंडळाच्या मागे व पुढे असलेल्या मंडळांमध्ये डॉल्बी सिस्टीम सुरु होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे असलेल्या यंत्राद्वारे घटनेच्या ठिकाणी असलेला सर्व आवाज आत्मसात होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत मंडळाच्या मागे व पुढे असलेल्या मंडळांचा आवाज बंद करून आम्ही आवाज घेतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी आम्ही

यंत्राद्वारे घेतला त्या ठिकाणी असलेला आवाज आत्मसात झाला. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.०९.२०२३ रोजी डॉल्बीबाबतची सर्व कायदेशीर प्रक्रिया ही नरेंद्र पाटील व इतरांनी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी त्या मशीनमधून एकूण किती प्रिंट काढल्या व त्या कोणकोणत्या मंडळांच्या होत्या हे मला माहिती नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी आम्ही प्रिंट काढली त्यावेळी त्या मंडळांचे नाव टाइप केले होते.आता मला दाखविण्यात आलेल्या नि. १४ वरील पावतीवर गणेश जयंती एवढेच शब्द नमूद आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदरचे मशीन हे पुर्ण नाव घेत नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. १४ वरील पावती ही संभाजीराजे तरूण मंडळाबाबतची नाही. सदर कामाबाबत माझा जबाब त्याच दिवशी घेण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब माझ्या सांगण्यानुसार नरेंद्र पाटील यांनी नोंदवून घेतला होता. पथक प्रमुखांनी ध्वनी तीव्रता यंत्राणे मोजलेल्या प्रिंटवरती मंडळाच्या अध्यक्षांची सही घेण्यात आली नव्हती. माझ्या जबाबात "पथक प्रमुखांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत ध्वनी तीव्रता यंत्राने मोजलेल्या प्रिंटची प्रतवरती मंडळाचे अध्यक्ष यांची सही घेण्यात आली" हे वाक्य चुकीचे आहे. माझ्या जबाबावर मी सही केली होती. त्यावेळी मी माझा जबाब पुर्ण वाचला नव्हता. माझ्या जबाबात "ट्रॅक्टरच्या बॉनेटवर लोक उभे होते, पाठीमागे डॉल्बी लावला होता, नरेंद्र पाटील यांनी सांगितले की, जास्त डॉल्बीचा आवाज आहे वापर करू नका त्यांनी डॉल्बी आवाज कमी केला नाही" असा मजकूर नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबात "ट्रॅक्टरच्या बॉनेटवर लोक उभे होते, पाठीमागे डॉल्बी लावला होता, नरेंद्र पाटील यांनी सांगितले की, जास्त डॉल्बीचा आवाज आहे वापर करू नका त्यांनी डॉल्बी आवाज कमी केला नाही" असे शब्द नमूद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, "ट्रॅक्टरच्या बॉनेटवर लोक उभे होते, पाठीमागे डॉल्बी लावला होता, नरेंद्र पाटील यांनी सांगितले की, जास्त डॉल्बीचा आवाज आहे वापर करू नका त्यांनी डॉल्बी आवाज कमी केला नाही" हे मी खोटे सांगतो.

११. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांना मी आजरोजी प्रथमच न्यायालयात पाहिले. माझ्या माहितीनुसार संभाजीराजे तरूण मंडळ कोडोली गावात एकच आहे. मंडळाचे अध्यक्ष कोण, उपाध्यक्ष कोण, त्यांचे खजिनदार कोण, त्यांची इतर बॉडी कोण यांची नावे मला सांगता येणार

नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, संभाजीराजे तरूण मंडळ यांच्या पदाधिकाऱ्यांबाबत मी माहिती घेतली होती. सदर मंडळे ही नोंदणीकृत असल्यामुळेच आमच्याकडे परवानगी अर्ज करतात. हे म्हणणे खरे नाही की, ज्या मंडळांची नोंदणी आहे तेवढयाच मंडळांना आम्ही परवानगी देतो. हे म्हणणे खरे आहे की, नि. १४ वरील प्रतिवर युजर नेम, व्हॉउचर नेम नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.१४ वरील प्रतिवर युजर नेम खाली सही नाही.

प्रश्न – नि. १४ वरील प्रतिवर सर्व जागा का भरलेल्या नाहीत ?
उत्तर – सदर जागा का भरलेल्या नाहीत याबाबतचे तांत्रिक ज्ञान मला नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, सदरची प्रिंट ही जागा भरलेली नसल्यामुळे अपुरी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दाखविण्यात आलेली नि. १४ वरील प्रिंट ही खोटी प्रिंट आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी मी मिरवणुक सुरु होण्यापूर्वी कोणतेही डेसीबल घेतले नव्हते व मिरवणुक सुरु झाल्यानंतर देखील मी कोणतेही डेसीबल घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केलेला सर्व मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला ध्वनीक्षेपण यंत्रा वापरण्याचे कोणतेही ज्ञान नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी या कामी दाखल केलेले माझे प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत व इतर कागदपत्रे ही खोटी कागदपत्रे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ डी. वाय. एस. पी यांनी सदरची फिर्याद दाखल केलेली आहे व ते माझे वरिष्ठ आहेत व त्यांना मदत करण्याच्या हेतूने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.०९.२०२३ रोजी कोणकोणते मंडळ मिरवणुकीत होते याची माहिती मला सांगता येणार नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या इलेक्ट्रॉनिक वस्तूमधून प्रिंट काढल्यास सदर प्रिंट शाबीत होण्याकरिता भारतीय पुरावा कायदा कलम ६५–बी प्रमाणपत्र आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मशीनबाबत ६५–बी प्रमाणपत्र मी दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबामध्ये मंडळाचे अध्यक्ष यांची प्रिंटवरती सही घेण्यात आली असे नमूद आहे परंतु प्रस्तुत

कामामध्ये दाखल असलेल्या प्रिंटवरती मंडळाचे अध्यक्ष यांची सही दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रिंटवरती युजर नेम रकाना कोरा आहे.

१४. मी पोलीस या खात्यामध्ये १५ वर्षांपासून काम करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या गुन्हयामध्ये एखादे वाहन विना नंबर वापरले गेले असेल तर अशावेळी त्यासंबंधीचा स्वतंत्र खटला दाखल केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, मी सरतपासात कथन केलेल्या वाहनावर नंबर नव्हता त्यासंबंधीचा स्वतंत्र खटला दाखल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत घटनेमध्ये कोणतेही वाहन वापरले गेले नसल्यामुळे त्याबाबतची स्वतंत्र कार्यवाही आम्ही केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्यावेळी डॉल्बी सिस्टीम गुन्हयात वापरलेली असेल तर अशावेळी संबंधित मालकाविरुद्ध देखील खटला दाखल केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात असलेल्या डॉल्बीबाबत त्याच्या मालकाविरुद्ध या कामामध्ये अथवा त्याबाबतचे स्वतंत्र प्रकरण करून कार्यवाही करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशा पद्धतीचे कोणतेही डॉल्बी सिस्टीम वापरलेले नसताना केवळ पोलीस खात्याने कार्यवाही केली हे दाखविण्याकरिता सदर प्रकरणामध्ये खोटी कागदपत्रे तयार करून मी खोटा जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबात आरोपीने कशाचा वापर केला याकरिता डॉल्बी हा शब्द वापरण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत आरोपीच्या मंडळाने कोणतेही वाद्य वापरलेले नसताना केवळ आरोपीला अडकविण्याच्या हेतूने सदरचा खोटा जबाब मी दिलेला आहे.

१५. माझ्या माहितीनुसार कोडोली गावची लोकसंख्या अंदाजे ४६,००० हजार आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावाचा एकूणच भूभाग हा बराच मोठा आहे व त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक, चावडी, गरुड चौक, कुंभार वाडा, चर्च भाग असे वेगवेगळे भाग असून त्यांना वेगवेगळी नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर ध्वनीमापन हे कोडोली या गावासंबंधीचे आहे.

१६. हे म्हणणे खरे आहे की, संभाजीराजे तरूण मंडळ कोडोली या नावाची प्रिंट आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची प्रिंट ही नि. १६ येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रिंटवर संभाजी मंडळ असे नाव नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नि. १६ वरील प्रिंटमध्ये

नावामध्ये खाडाखोड दिसून येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची नि. १६ वरील प्रिंट संभाजीराजे तरूण मंडळ यांची नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांवरती आवाजाची सर्व सामान्य पातळी तीव्रता असे वेगवेगळे घटक नमूद नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, प्रमाणपत्रावरती असे मजकूर येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नि. १६ वरील प्रिंटमध्ये लोकेशन कोडोली असे दिसून येत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

सही/–
**(के.दि.काकतकर)**
दिनांक. ३०.१०.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा